# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 09/03/2021 (मंगळवार)

(सकाळ)

---

### फसवणुक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर स्नेह नगर मौदा येथे दिनांक 07/03/2021 चे 09.30 वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ. विना रामकिशन वैद्य, वय 43 वर्ष, रा. स्नेहनगर मौदा जि नागपुर यांचा माबाईलवर अज्ञात आरोपीने फोन करून म्हटले की, ''मी एसबीआय मेन ब्रांच मधुन वर्मा बोलत आहे, तुमच्या मोबाइल क्रमांकावर ओटीपी आला आहे, तो आम्हाला सांगा तुमच्या अकाउंटचा वेरीफीकेशन सुरू आहे'' यावरून फिर्यादीने आरोपीला ओटीपी सांगीतले असता फिर्यादीच्या अंकाउन्ट मधुन 19,998/–रू. काढले. त्यानंतर फिर्यादींची मुलगी ही कॉलेज मधुन घरी आल्यावर तीने आरोपीच्या फोन वर कॉल केला व म्हणाली की, ''तुम्ही जे आमचे पैसे काढले आहात ते आम्हाला परत करा'' यावरून आरोपीने 19,998/–रू. परत केले. दि 08/03/2021 चे सकाळी 11.30 वा. फिर्यादी स्टेट बॅक ऑफ इंडीया मध्ये जावुन तीचे पती यांच्या सॅलरी अकाउंट ची स्टेटमेंट काढले असता समजले की तीच्या पतीच्या अकाउंट मधुन योना ॲपसचा वापर करून ऑनलाइन 2,48,400/–रू. लोन घेउन ते पैसे फिर्यादीच्या पती यांच्या पेशन अकाउन्ट मध्ये ट्रान्सपर करून पेशन अकॉउन्ट मधुन थोडेथोडे करून एकुण कि. 2,48,400/–रू. काढुन घेत फिर्यादींची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. सहकलम 66 डी मरहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कुथे 9764007720 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. सावनेर :– दि. 07/03/2021 चे 24:00 वा. चे सुमारास 15 वर्षीय फिर्यादी/पिडीता हि घरी झोपली असतांना आरोपी नामे– नवनाथ शिवाजी सावंत, रा. अमरावती हल्ली मु. हेटी शिवार सावनेर (नाथजोगी)याने तिच्या घरी प्रवेश करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने पीडितेला सदर बाब कुणालाही सांगितल्यास तुला व तुझ्या घरच्या लोकांना मारून टाकीन अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (अ), 504, 506 भादंवि. सहकलम 7,8,9,10 बाल लैंगीक अत्याचार प्रतिअंधक कायद्यन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि पाटील 8805253982 या करीत आहे.

# अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 20 कि.मी. मौजा उंद्री सुरगाव येथे दिनांक 05/03/2021 चे 12:45 वा. दरम्यान अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एम.एच–40/डी– 0178 क्रमांकाचा हिरो होन्डा सिडी डॉनला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– सतिश उर्फ सोनु विनोद कांबळे (मृतक) वय 34 वर्ष रा. प्लाट नं. 224 सर्वोदय नगर, नागपुर याच्या डोक्याला गंभीर जखम होवुन त्याचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा दिलीप लांजेवार पो. स्टे. कुही यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134, 187 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मंडावले 9763234548 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 30 कि.मी. मौजा गंगवानी खदान पाचगाव येथे दिनांक 08/03/2021 चे 14:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अशोक दशरू ध्रुव, वय 41 वर्ष रा. मलदी नहरपारा ता.जि.बलोदा बाजार राज्य–छत्तीसगड ह.मु.गंगवानी खदान पाचगाव ता.उमरेड जि.नागपुर हे घरी हजर असतांना त्यांना गंगवानी खदान पाचगांव येथील पोकलॅड ऑपरेटर यांचा फोन आला व त्यांनी सागीतले की, ''कोणीतरी ट्रक चालकाने तुमच्या मुलाला ट्रकचे खाली दाबुन टाकले'' अशी माहीती मिळताच फिर्यादी व त्याची पत्नी हे घटनास्थळी जावुन पाहीले असता फिर्यादीचा मुलगा मृतक नामे– शत्रुघ्न अशोक ध्रुव, वय 14 वर्ष याचे वरून ट्रकचे चाक गेल्याने त्याचे डोक्याला मार लागल्याने तो गंभीर जखमी झाला. फिर्यादीने मृतक शत्रुघ्न ध्रुव याचे जवळ जावुन पाहीले असता एम. एच–40/एके– 6492 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने आजु बाजुला व ट्रकच्या चालकाने मागे पुढे न पाहता ट्रक मागे घेत असतांना फिर्यादीचे मुलाचे अंगावरून ट्रकचा मागील टायर गेल्यामुळे फिर्यादीचा मुलगा मरन पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोनि/मदने 9922436195 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर